१८९

उ. ग्रंथ. १८०८

# रसंशोधन

लेखक–

गणेश रामकृष्ण हव

होमरकृत इलियडचें का

विश्वनाथ नारायण

चरित्र, श्रीगणेशपु

(गोल्डस्मिथकृत डेझर्टेड

आर्यावृत्तांत भाषांतर व

(श्रीव्यासकृत महाभा

मोरोपंतकृत आर्या

ांची तुलना कर

) यांचे

११८९३

लायब्ररी, सातारा.

नं. १८९

प्रकाशक–गणेश रामकृष्ण हवलदार

आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई.

SHRI CHA. PRATAPSINH
MAHARAJ (THORLE)
NAGAR WACHANALAYA, SATARA.
088813

# प्रस्तावना

एकाद्या धंद्यांत स्थिर होण्यापूर्वी, हल्लींच्या परिस्थितींत आमच्या शिकलेल्या तरुण मण्डळीच्या तीन ककारांचा ( काय, कांचन व काळ यांचा ) अक्षम्य व्यय कसा होतो तें तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या आपल्या वृत्तिसंशोधन नामक लघुकाव्यांत प्रस्तुत ग्रंथकारानें दाखवून दिलें आहे. आतां स्त्रीपुरुषांच्या सामाजिक दर्जात रूढ असलेल्या विषमतेची जाणीव शिकलेल्या मुलींस होत असल्यामुळें व जुन्या विचारांच्या वडील मण्डळीचें व नव्या विचारांच्या मुलींचें पटत नसल्यामुळें वरसंशोधनाचें कार्य किती अनवस्थित झालें आहे तें दाखविण्याकरतां हें लघुकाव्य जुन्या नव्या विचारांच्या वाचकांस सादर करण्यांत येत आहे.

आंग्रेवाडी,
गिरगांव.
५ जून १९३७

गणेश रामकृष्ण हवलदार.

# वरसंशोधन

## प्रसंग १

निर्मीत जो गगनिं वायु सदा अदास ।
पक्षी पशू वनिं विमुक्त चरावयास ॥
स्त्रीजाति ही परवशा परि मानवाची ।
निर्मीत तोचि विधि वा दुसरा नवाची ? ॥१॥

वाटे जुन्याच विधिची बनली जडा धी ।
ती निर्मितां पुरुषजाति अशेष आधीं ॥
तेणें पुढें न समनिर्मिति त्यास साधे ।
स्त्रीजातिला विषमता मरणान्त बाधे ! ॥२॥

मातें अशी विषमता कळण्या, विधाता ।
देई दयाविषय एक बघूनि माता ॥
हें संचितें घडुनि ये, अथवा डहाळी ।
मोडे, बसे वरतिं काकहि त्याच काळीं ? ॥३॥

माझी माय वदूं कशी, जन वदे, नांदे सदा सासरीं ।
दासाची न तिला परी तिच्चिच ये त्या एक दासा सरी ! ॥
आशीर्वाद दिले बहू गुरुजनें "हो अष्टपुत्रा तिशीं" ।
झाला पुत्र न एक तों तिज गमे लागे वटूं बत्तिशी ! ॥४॥

या स्पष्ट अप्रिय परिस्थितिमाजि एक ।
झालें अयाचितपणें तिज मींच लेंक ! ॥

आतां परी मन तिचें अति मोद पावे ।
पाठान्तरें गुरु सशिष्य जसा सुखावे ! ॥५॥

माता सजे गृहिं व अंगणिं वेल तुम्बी ।
कैसें न कौतुक करील कुणी कुटुम्बी ? ॥
क्रीडेंत धेनुसुत खावुन वेल जाय ! ।
नेई हरून रविचा सुत तेंविं माय ! ॥६॥

" आई " व " ओ ! " मधुर शब्द सदैव जेथें ।
होते घरीं घुमत आज परन्तु तेथें ॥
आईस बाहत फिरून दिशांत दाही ।
कर्णांत " ओ " न पडतो मम एकदांही ! ॥७॥

ज्यां खेळवीत असतां बसवून अंकीं ।
होई पित्यास सुख ज्यास अगण्य अंकीं ॥
तो त्यां मुलां निभविण्या करि दूर आजी ! ।
आजोळची मजसिं घेउन गेलि आजी ॥८॥

दादास पुष्कळ लळा प्रिय मावशीचा ।
ती त्यास ने, स्तव करूं किति मी अशीचा ? ॥
आला खरा समय ! " माय मरो बिचारी ! ॥
ती मावशी पण जगो " म्हणती विचारी. ॥९॥

योग्य तें करुनियां घटिकेला ।
तात दे मुलिं न थांग टिकेला ॥
तुष्ट होउनि म्हणे " वरि सोय ।
सोयरा पद निरर्थ न होय." ॥१०॥

## प्रसंग २

होता मारित हांक मातुल सदा आजीस "आई" अशी ।
गेली तीच बसून हांक सहजीं माझ्या मुखींही तशी. ॥
आजी ऐकून ती रडे, कधिं म्हणे "केलें कसें ईश्वरें ! ।
'आई' कोण म्हणे मला,अहह ! मी आई कुणाची बरें !"

माझी झणीं जननिची स्मृति बालिकेची ।
होती विलुप्त; जन देतिल होउं कैची ? ॥
" आई कुठें ? " " वरतिं दाखिव बोट बाळ ! " ।
घेती कवाइत अशी करुनी दयाळ ! ॥२॥

उलटतां दिन, मास व वत्सर ।
रुचिर बाळपणास चढे भर. ॥
करुनियां श्रम वेंचुनियां धन ।
उरवि मातुलही मम हौंस न. ॥३॥

विविध खेळ किती ! कपडे किती !
पुरवितां कुणि हात न टेंकिती ॥
कितिक मोडुनि, फोडुनि मी फुगे ।
रडुनि आरडुनी रुसुनी फुगें ! ॥४॥

करिन यापरि, तें करुनी दिलें ।
जरी परोक्ष कुणी कुणी निंदिलें ॥
वदुं नये वदलें जरि बाष्कळ ।
म्हणति लोक " न ही मुखदुर्बळ. " ॥५॥

माझे पाहुनि लाड, बाळ अपुल्या आईस कोणी पुसे ।
"कां गे ! लाड असे कधीं न करिसी जेव्हां घरीं मी रुसें ?"
आई सांगत " माय जाय ग हिची देवाकडे म्हाळसे " ।
'केव्हां जाशिल तूंहि' बाळ वदलें आईस येई हंसें ! ॥६॥

ज्यांची अकृत्रिम गिरा विजयी सदैव ।
जीं लाभतात मनुजा असल्यास दैव ॥
व्हा त्या शिशूंसह जरा रमण्यांत दंग ।
स्वर्गाहुनी सुख मिळेल तदा सवंग ! ॥७॥

कोणी असाल दुसरे परि लोक साधे ।
ज्यांतें शिशूंत रमणें न मुळींच साधे ॥
ते हो तुम्हीं ! दुरुन घ्या बघुनी मुलींचे ।
जे खेळ चालति घरोघर बाहुलीचे. ॥८॥

तो धन्य जो पुरुष निर्मुनि बाहुलीला ।
लोकीं प्रदर्शित करी निज बाहु-लीला ॥
सासू, वधू, नणद, बालक एकटीच ।
ही बाहुली विविधवेश गमे नटीच. ॥९॥

वाटे मुलींस गृहिणी पद-पाठ सांगे ।
संसार त्यांस म्हणुनी बहु गोड लागे ॥
गावोनियां स्तुति अशा मग बाहुलीची ।
नाहीं कसा कमाविणार घसा विरिंची ! ॥१०॥

## प्रसंग ३

कोणी पिण्या घे मुलगी ठकीला ।
पान्हा जसा ये तिज बैठकीला ॥
येई यशोदेस तसा न पान्हा ।
प्यायास घेतां पदरांत कान्हा. ॥१॥

" जा मण्डपांत. तुजला उरलें न भान
हे ऐक शब्द; शुभमंगल सावधान; ॥
शृंगार या करकरून सख्या मिळाल्या ।
आल्या लगीन बघण्यास अधीर झाल्या ". ॥२॥

चोरून अंतरपटावरुनी पहाणें ।
खोडी वरांत दिसते असुनी शहाणे ! ॥
सांगे वरा करवली " अशी काय घाई ? ।
आहे तुझीच तिजला वद कोण खाई ? " ॥३॥

गेलें लागुनियां लगीन शुभ ती वेळा जशी पातली ।
आजी येउनि बोल बोलिलि जणूं मोत्यॅच शिंप्यांतलीं ॥
" कोठेंही पुरुषाहुनी प्रकृतिची नाहीं दशा वेगळी ।
प्रेमें यास्तव घालिती वरवधू अद्वैतमाला गळीं ". ॥४॥

" माझें काय करीन काम अवघें येऊन सांगाल जें " ।
एकाही नव्हतें मुखीं वचन हें जें सांगकाम्या सजे ॥
कोणाची बसुनी मुली न बघती आतां जरा वाट ती ।
एकी कुंकुं, दुज्या मुठी भरुनियां ती शर्करा वांटती. ॥५॥

तों " जांवई " कुणि म्हणे " हळवा भुकेचा " ।
"सोसेल आज तरि त्यास उशीर कैंचा !" ॥
कां वाढतील न मुली अज शीघ्र पानें ? ।
राहे सजीव अधिकार बजावल्यानें ! ॥६॥

पंक्ती विशेष सजल्या बसतां विहीण ।
झाला उन्हांत मिरवून बहूत शीण. ॥
कोणी म्हणे " म्हण सये ! डगुमावशीस ।
गाणें ' गडे ग ! पुरली मनिची न हौंस " ॥७॥

माता म्हणे " सकल वित्त करून गोळा ।
म्यां पोटचा निजकरें उचलून गोळा
आहे दिला अज तुम्हांस करून मान
पाळा तया जपुन नित्य मुलीसमान." ॥८॥

झाली रात वरात काढिति, तदा वाद्यें बहू वाजती ।
बाळा घालविली कशी शिशुपणीं ! कोणी न नांवांजती !॥
झांलें अंगण शून्य, चित्तहि तसें, मी जाहलें बावरी ।
कन्या काष्ठमयी व्यथाकर अशी ! व्हावी किती जी खरी !

ऐशा अंगणिं मैत्रिणी जमुनियां कीं पाखरें गोजिरीं ।
चाले चिल्बिल खेळ जोंवरि सुरू राहे तिथें तोंवरी ॥
नाना खेळुन खेळ मारुन उड्या नाचून साऱ्या दिनीं ।
होतां भातुकली घरोघर मुली जाती सुखें भुर्दिनीं. ॥१०॥

## प्रसंग ४

हे खेळ मातुल बघे नच सौख्य पावे
खेळांत सर्व मुलिचें वय कां खपावें ? ॥
होतां विवाह पतिच्या गृहिं सज्ज सेवा ।
मांडे मनांत मग शिक्षणरूप सेवा ! ॥१॥

आजीलागीं भुरळ पडली मानला हा विचार ।
शाळेमाजी दवडि मजला लोटला नाहिं वार ॥
खोटें वाटो खचित कथितें हा खरा कोंडवाडा ।
राखी त्या स्त्री, प्रिय जिस छडी लावुनियां कवाडा. ॥२॥

ग्रासांत किन्तु पहिल्याच पडून माशी ।
या बाईचें शिकवणें गिळवे न माशीं ॥
ज्यांच्या अहा ! करतला नमितें सरोज ! ।
त्याही शिशूंस छडिचा सहवास रोज ! ॥३॥

शिक्षाव्रताहुनि दुजें व्रत जी न पाळी ।
त्या बाइचा परुष शब्द शिरे कपाळीं ! ॥
मातें खरोखर असा नच ताप साहे ।
आजी म्हणे " कठिण जाइल तापसा हे. ॥४ ॥

हत्यारांचा कायदा ह्या छडीला ।
केला नाहीं लागु कां या घडीला ? ॥
बुद्धीची ज्यां मानिती लोक कोठी ।
त्याही मंत्र्यां ना कळे चूक मोठी ! ॥५॥

जीतें न मातृपदलाभ घडून आला ।
ती स्त्री न योग्य शिशुशिक्षक व्हावयाला ! ॥
तूं सोड साळ. शिकवीन बसून पाशीं ।
विद्येविणें तुज न ठेविन मीं उपाशी " ॥६॥

आजी दे दर अक्षरास मजला खारीक वा रेवडी, ।
गोरी चांदणीच्या परीस अथवा पेपर्मिटाची वडी, ॥
पेढा जो न टके जिभेस, गळिं जी वर्फी विरे केशरी ! ।
झालें गोड असें घरांत शिकणें ज्यातें न कोठें सरी. ॥७॥

मी ओळखी त्वरित अक्षरसृष्टि सर्व ।
ज्ञानी म्हणाल तर होय मला न गर्व ॥
अज्ञाननाशकपर्यं मज याच जाणें ।
आनंद तो अनुभवाविण कोण जाणें ! ॥८॥

विद्येस मी बिलगता करि कौतुकाशीं ।
आजी म्हणे " अशि गुळा चिकटे न माशी. " ॥
आजीस नीतिविषयीं बलवत् अगत्य ।
माझ्या तिनें वसविलें वदनांत सत्य. ॥९॥

" हे ! आजि ! तूंच मम माय व तूंच बाप ।
मोजावया उपकृती न कुठेंच माप ॥
हें या ऋणें जड सदा शिर वांकवीन ।
गातील कीर्ति तव ते कुठले कवी न ? ॥१०॥

## प्रसंग ५

एके काली घरिं उतरले पाहुणे वित्तशाली ।
तत्त्वींवांके जडनगभरें जेविं धान्याढ्यशाली ॥
आतिथ्याला त्वरित उत ये. केवढें पुण्य भाळीं ।
वाटे याची दिवशिं दसरा आणि आली दिवाळी. ॥१॥

पाहे त्याच्या नयनिं भरलें एक माझेंचि रूप ।
आजीलागीं म्हणत धरुनी पाहुणी ती हुरूप ॥
" वाटे आम्हां खचित तुमची नात शोभेल सून " ।
आजी बोले " कशि तुलितसा कस्तुरीशीं लसून !"॥२॥

ही मागणी हळुच घातलि पाहुणीनें ।
शेळीस कीं शपथ निर्दय वाघिणीनें ! ॥
डोकावुनी विरह भावि मला दटावी ।
कांपावया हिंव जणूं मज शीघ्र लावी ! ॥३॥

होता उभा जवळ भाभळभट्ट तूर्त ।
सारें तयास कळलें बहु होय धूर्त ॥
बोले " करील नकळे धण ही कुणाची ? ।
जी होय केवळ अमोल डबी गुणांची. "॥४॥

घेई भरून तपकीर तदा चिमूट ।
सेवी तिचें सुख जरा बसुनी निमूट ॥
कोणी बघून म्हणता श्रमतांच भूक ।
निद्रापराजित बसे शुकराज मूक ! ॥५॥

गालांत हास्य उठवी सुचतां उपाय ।
" आर्यी " म्हणे " कळुन या वरगोत्र काय." ॥
कर्णांत गोत्र पडतां मुरूडून नाक ।
सांगे " न गोत्र पटतें ! विधिचाचि वांक ! " ॥ ६ ॥

आली कळोन मजला परि गोष्ट साधी ।
कीं जाय औषधिविणें सगळीच आधी ! ॥
वेळींच सावध करून अम्हांस काई ।
ती पाहुणी सपरिवार निघोन जाई ? ॥ ७ ॥

कांहीं रडून लडिवाळपणें हंसून ।
मीं घेतलें वचन आजिस गुंतवून ॥
कीं मी तुझें लगिन तूं असतां अजाण ।
देणार नाहिं करुं हें विधिचें लिखाण ! ॥८॥

ऐसें धोरण ठेउनी प्रकटवी आजी मनीषा अर्जी ।
यत्ता चार मराठिच्या करुनियां तूं शीक गे इंग्रजी. ॥
शाळेची त्यजिली फिरून धरिली मी आर्जवें वाट ती ।
वस्तू अप्रिय आज त्या प्रिय उद्यां स्वार्थामुळें वाटती ॥९॥

होतांच संकलित चार यत्ता ।
आली मराठीवर इष्ट मत्ता. ॥
तेव्हां तिचें सोडुन मूळ तारूं ।
मी इंग्रजीचा बनलें उतारू. ॥१०॥

## प्रसंग ६

मी इंग्रजी बघुन सुन्दर एक शाला ।
आजीस वंदुनि निघें जंव जावयाला ॥
मामा म्हणे " सफल हेतु तुझा घडावा ।
या कारणें तुज असो खग चास डावा. " ॥१॥

ती वस्तु विस्मृत पुन्हा जशि आठवावी ।
विद्या तशीच अचकी मज येत जावी. ॥
आश्चर्य हें समजतां मुख आणि बोट ।
यांची सदैव करिती जनलोक भेट. ॥२॥

मामा कधीं कधिं धरून मदीय पाठ ।
पाही घडे नव कसे करिं कण्ठपाठ; ॥
देऊं म्हणे " तुजसिं शिक्षण तें उदार ।
ज्या मानिती सकल उन्नतिचेंच दार. " ॥३॥

जातां ज्यांतुनि नित्य येत नयनीं कांहीं जणांच्या टिपें ।
गेलें इंग्रजिच्या पथें सहज त्या टाकोनि मोठीं टिपें ! ॥
ऐकोनि स्तुति आपुली जनमुखें जी लाजलें सर्वदा ।
ती मी वाजवुं आज कां निजमुखें माझी तुतारी वदा ? ॥४॥

संक्षेपें कथितें म्हणून शिरलें मी विश्वविद्यालयीं ।
जेथें सर्व उभारणी त्रिभुवनीं गाजे परीक्षामयी । ॥
तेथेंही पदव्यांसवें मिळविलीं मी थोरलीं बक्षिसें ।
लोकां दाखविलें स्त्रिया असति या सोनें, न साधें शिसें ५

अभ्यासवृत्त मज रोजनिशी पहातां ।
लागे करून बहुशोधन अल्प हाता ॥
त्या काळचे स्फुट विचार मनःप्रविष्ट ।
होतात दृश्य परि ते न तसे विशिष्ट. ॥ ६ ॥

येतांना फिरुनी प्रभातसमयीं मी सर्वदा आढळें ।
सायाह्नीं लघुकाळ बेत न मम क्रीडागृहींचा ढळे ॥
व्याख्यानें रुचती तशीं प्रवचनें चर्चाहि संबद्ध ती ।
अभ्यासांतिल खण्ड काढि भरुनी माझी अशी पद्धति. ७

या पृथ्वीच्या सतत फिरला भानु जो भोंवतालीं ।
त्या वाटोळ्या उलट घिरट्या आज पृथ्वीच घाली ! ॥
नाहीं ज्ञान स्थिर कधिं, असें तत्त्व पाडोनि कानीं ।
शिष्यालागीं शिकविलि बरी बुद्धि अध्यापकानीं. ॥८॥

जुनेंच सोनें व नवें कथील ।
कसें असें जो कवि तो कथील ? ॥
जुन्या जुन्याच्याच करून राशी ।
कां ठेवणें त्या धरुनी उराशीं ? ॥ ९ ॥

मेंढीस केल्या गुरु, खंदकातें ।
नेतां तिनें, काय पुसाल " कां तें ? " ॥
गर्भान्ध ती निष्फल होय भक्ति ।
होते जयी नित्य विचारशक्ति ! ॥१०॥

## प्रसंग ७

येवोनी हितपूर्वचिंतक सखे जे आप्त मध्यंतरीं ।
लग्नाचे गुणवर्णुनी परतले संसारधन्वंतरी ॥
आतां ते फिरूनी उठाव करिती होतांच विद्या पुरी ।
आजीलाहि विचार फार पडला; तो तात राहो दुरी. ॥१॥

"माघारी फिरली हिची" कुणी म्हणे "सारी कुमारीदशा।
तारुण्योदय जाहला ! अधिक मी आतांच सांगूं कशा ! ॥
धर्माची रति शुद्ध, रूढि बलवत्, चोखा सदाचारही ।
संभाळा हितकाम धार्मिक अशीं तत्त्वें सदा चार हीं." ॥२॥

आजीच्या पुढतीं सनातन उभा केला जनें धर्म तो ।
एका हातिं जनापवाद दुसऱ्या हातीं बहिष्कार तो ॥
होती स्वस्थ बसून साहजिकची हा सर्वही काळ जी ।
आतां दुःखद राहिली जडुनिया आजीस त्या काळजी. ३

सारा तिचा त्वरित धीर उडे मनींचा ।
पाला जसा उडतसे पवनें वनींचा ॥
अंतर्व्यथा प्रकटवी, दुसरी तशी न ।
स्त्री दावुनी मुख फिकें पडदानशीन ! ॥४॥

आजी तों मनिंच्या मनीं पुटपुटे " ये विघ्न हें घातुक !
केलें काय व काय होइल पुढें कोणा नसे ठाउक ! ॥
सोडा नेम धरून धोंड गिरिच्या माथीं उभें राहुनी ।
जातांना भलतीकडे उडतची ती नांवरे मागुनी ! ॥५॥

वाटे बालविवाह काय नडला माझ्या मुलीला जरा
आतां प्रौढविवाह नातिस तरी मानो, न जो लाजरा !
विद्या सर्व सरे व शोधन उरे तीच्या वराचें परी ।
आशा कीं कृतकृत्य, तें करुनियां—होईन मी लौकरी.॥६॥

आले हे तुळसीविवाह जवळी द्याया जनां सूचना ।
लग्नाच्या उजवा मुली कधिं तरी त्या द्यावयाच्याच ना ?॥
सांगे माभळभट्ट ‘ योग दिसतो यंदांच या मोसमीं ।
झाल्या हें उलथें, धरीन न कधी पंचांग हातांत मीं ’॥७॥

ही गोष्ट होय न नवी दिसते अनादी ।
सर्वत्र सर्वचि मुलें असतात नादी ॥
घ्या त्यांतलें उचलुनी अज कोंकरूं ही ।
वाचा खपे नच तयास ‘ नको करूं ही ! ’ ॥ ८ ॥

विद्यार्थी म्हणजे खरेंच कथितें कीं आज जो तो उठे ।
स्वच्छन्दें सफरी मधून मधुनी काढी कुठेच्या कुठे ! ॥
भाचेरीं जमवून जाय करण्या मामाच देशाटन ।
तेणें शिक्षण पूर्ण होय म्हणुनी मी घेतला हट्ट न. ॥९॥

ओझें शिरीं मम नभासम हें पहातें ।
जोगेश्वरीच उतरील हळूच हातें ॥
नाहीं उळीग इवलीहि हिच्या पित्याला ।
देईल ती उचित बुद्धि तथापि त्याला !” ॥१०॥

## प्रसंग ८

म्हातारा न तसा, तसा न तरणा माझा बिचारा पिता ।
लग्नाचें वय हें सखे ठरविती कन्या तया अर्पितां ॥
राणी नूतन देखणी मम पिता पाणी न पी तीविणें ।
ठेवावें न मुठींत कां न असल्या त्या दादल्याला तिणें !॥१॥

ताताचें चुकतांच त्यास हिणवी पाहून ही त्याकडे ।
" होतें सांगितलें तसें परि तुम्हां माझें दिसे वांकडें ॥" ॥
"भाग्यें" तात म्हणें तदा "चतुरही भार्या सुशीला भली ।
दावाया चुकतांच वाट मजला पाटी पथीं लाभली !" ॥२॥

एका कडोसरिस हातरुमाल साजे ।
किल्ल्या दुजीस पतिवित्त गमे तिला जें ॥
ती एवढ्यांतचि मनीं बहु तुष्ट राही।
त्याचें प्रदर्शन तिचा करि चेहराही ! ॥३॥

" आहेत काय घरिं "? " होइल भेट कोठें ? " ।
" येतील ते कधिं ? " पुसोत लहान मोठे ॥
प्रत्युत्तरें उचित देउनि शीघ्र माई ।
त्यांतें पुसे " कुठिल ? कोण ? व काम काई ? " ॥४॥

भाज्या स्वादु करी व मिष्ट चटण्या ही भातही मोकळा ।
सोळावीहि हिची स्त्रियांस न दुजां ये सूपशास्त्रीं कळा. ॥
भूषालंकृतिचा हिच्या गिरवितां कित्ता स्त्रियांच्या गणें ।
व्हावें कां न अशा स्थितींत पतिला आकाश तें ठेंगणें !॥५॥

" तो " आणि " ती " परि वृथा म्हणती भवा या !।
कीं " तेंच " तेथ न दिसे गृह शोभवाया ! ॥
तातास होय पुसट स्मृति आमची ती ।
स्वप्नांत अंधुकची जागृतिची प्रचीति ! ॥६॥

दादाला व मला घरास मधुनी प्रेमें पिता आणवी ।
जाणे तो न पुन्हां बसे कधि घडी जी मोडली ती नवी.॥
"हीं हो कोण ?"पुसे कुणी,मग म्हणे माई "मुलें आयतीं"।
आम्हीं झोंवतसों सदैवहि तिच्या नाकीं जशीं रायतीं !॥७॥

हें " आयतीं " पद पिडा करि मानसा जें
त्या काळकूटसम ही उपमा न साजे. ॥
वाणी मुळांत अपसव्य हिची न सोसे ।
आम्हींच तातगृह वर्जियलें नकोसें ! ॥ ८॥

असारे संसारे श्वशुरगृह जें सार म्हणती ।
वियोगें कान्तेच्या फिरुन उलटें तें समजती ॥
कळों आलें ताता बघुन अमुचा राग न सरे ।
मुलेंची आहेती श्वशुरगृहींचें सार दुसरें. ॥९॥

सासूरवाडिस पिता मग येउं लागे ।
आजी म्हणे " कुणि न यासम माउला गे !" ॥
" खर्चीन " तो म्हणतसे " शतशः धनास ।
आतां उशीर न करा वरशोधनास !" ॥१०॥

## प्रसंग ९

गेली पार निशा, दिशा उजळल्या, झालें धुकें नाहिंसें।
कांहीं काळ परंतु पर्वतशिरीं किंचित्कचित् तें दिसे ॥
बाहेरी पडल्या स्त्रिया पुरुषही खाया हवा मोकळी।
पोरें धांवत चाललीं खपविण्या त्या वृत्तपत्रावळी !॥१॥

घालाया दुध चालले बसुनियां कोणी दुचाकीवर।
कर्णी मंडईचा पडे उठुनियां तो मंद मिश्रस्वर ! ॥
स्वारी शोधित चालतां पथिं कशी किर्कीर टांगा करी !
जागी होउनियां पुरी हलुहलु, आमोद चित्तीं वरी. ॥२॥

सर्वत्र जागृति अशी मग झोंप ही कां ?।
बाळीसची वश करी अशि अल्प शंका ॥
येतां, म्हणे विकृति कायिक काय गांजी ?।
खोलींत येउनि बसे मजपाशिं आजी. ॥३॥

तों बघे चिकटुनी शयनाला।
मी असें कृपण जेंविं धनाला ॥
अंग सर्व मम ती कुरवाळी।
सौख्य तें न विसरें कधिं काळीं. ॥४॥

प्रथम अंकुरली तनु, मागुती।
क्षणिक आलि न वा मज जागृती ॥
बदलुनी तितक्यांतचि मी कुशी।
कवळली गिरदी व तशी उशी ॥५॥

असुनि झोंप अशी मम अस्सल ।
गमलि आजिस ती परि नक्कल. ॥
हलवुनी वदली मजला मग ।
" प्रकृति नीट नसे तव काय ग ? " ॥६॥

अजिच वेळ टळे तव कासया ? ।
बघसि काय मुहूर्त उठावया ! ॥
जन मुहूर्त बघे लगिनास तो ।
लवकरी उठण्या नच लागतो. "॥७॥

हा शब्दसंचय मुहूर्त लगीन साधा ।
कर्णांत जाउन करीत बरीच बाधा. ॥
भाषा मला गमलिही सगळी कटाची ।
किंवा ध्वजा जणु पुरःसर संकटाची ! ॥८॥

मीं सांवरोन मन जों पुढतीं पहातें; ।
आजी पुसे कुशल तोंच वचें व हातें. ॥
बोलें तियेस " सुखरूप वसुंधरा ही ।
मी कां नसेन जर तींत संबंध राहीं ? ॥९॥

गुंडाळुनी वळकटीसह मी विचार ।
गेलें उठोनि पुरतें उघडून दार. ॥
जाणें न मी बसुन ती किति वेळ आजी ।
होती तिथेच सहजीं पसरून "आ" जी. ॥१०॥

## प्रसंग १०

सोत्कण्ठ उत्सुक अधीर अशीच कांहीं ।
आजी दिसे मज अहर्मुखिं आज कां ही ? ॥
तें सांगतें. परत दिग्विजयी घराला ।
होता निशासमयिं माभळ भट्ट आला. ॥१॥

छाया फिरे व उलटे नुगती दुपार ।
आहारुनी गृह करी चरणप्रसार. ॥
श्वा अंगणीं मिटुन नेत्र पडून राही ।
तें पर्ण मात्र पडतां उघडून पाही ! ॥ २ ॥

तों ये तार-निघून वेळ मिनिटें बारा दहा वाजुनी ।
कन्या ये तुमच्याकडे उतरण्या जाणून मैत्री जुनी ॥
आहे सोबत पत्र एक, मम जें हेतू तुम्हांसीं खरे ।
सांगे स्पष्ट करून. नित्य अपुला स्नेहाभिलाषी खरे. ॥३॥

आजी ऐकुन तार बोलत "असे माझें मला थोडकें ।
व्याख्यानें म्हणती तसें कुठुनियां हें धाडिलें घोडकें ?" ।
चित्तीं मीं म्हटलें " न येइल पुन्हां बोलावुनी संधि ही ।
आजीला पटवीन चालत कशी सर्वत्र भिक्षांदिही " ॥४॥

आजी म्हणे " गुरुजि ! हा करुनी प्रवास ।
आलां न लागुनि दिला मज अल्प वास ॥
आहेत ते वर कसे ? किति ? याद काढा ! ।
चिंता हरील मम जी, गद जेविं काढा." ॥५॥

वर्णी घेउनि एक एक वर तो चाणाक्ष हा मामळ ।
येई सारचि काढण्यांत सगळें त्याचें दिसोनी बळ. ॥
मी ही उत्तर देउनी पटपटां लावीं तयाला पथा ।
आजी स्तब्ध बसे थिजून; कथितें त्यांतील कांहीं कथा. ६

" ग्रन्थीं जाय गढून घेउन करीं जो टिप्पण्यांची वही ।
ज्याची भूक जिरे, तहानहि मुरे, 'निद्रा विरे सर्व ही' ॥
वाडा तो दृढ शांतिचा पति बरा बाळीस या मन्मतें." ।
"शान्ति ब्रह्म नको नको पति मला पायांस मीं लागतें!"७

" आत्मा हें उपनाम पावुन वसे जो जीव देहोटजीं ।
सत्य ब्रह्मचि तो; जगत् परि दुजें देहादि मिथ्या अजी ! ॥
ऐसें जें पतिरत्न तत्त्व शिकवी पुण्येंच तें लाभतें." ।
"मिथ्यादृष्टि नको नको पति असा पायांस मी लागतें."

"वाक्याला पहिल्या पडे श्रवणिं 'हां'दूजास गे ! 'जी' तव ।
हांजी हांजिचि ही कळेल तुजला व्युत्पत्ति निष्कैतव. ॥
देताती दर जांभईस चुटकी दासी तसे दास ते. " ।
'दासाचार्य नको नको पति मला पायांस मी लागतें' ॥९॥

मीं बोललें पुढतिं " यांत अमोल ठेवा ।
गुंडाळुनी वरपुराण तथापि ठेवा ! ॥
या पाहुणीस वर येतिल जे पहाया ।
आख्यान लावतिल तें श्रवण्या चलाया ! " ॥१०॥

## प्रसंग ११

" सांगा नांव " " शकुन्तला." " वय ? " " दिसे."
" वास्तव्य ? " " मुम्बापुरी." ।
'विद्या कोठवरी ?' 'प्रशस्त पहिल्या पंक्तींत बी.ए.पुरी.'॥
' येते पाककला ? ' 'न कार्य; असतां खाणावळीचे डबे!' ।
ऐसें उत्तर ऐकतां, वर निघे उत्साह त्याचा दबे. ॥१॥

'कांहीं ध्येय असे ? ' पुसे वर दुजा.'हा प्रश्न कां वाउगा?'
"ध्येय स्पष्ट नरापुढें मग कसा तो हिंडतो बा उगा ! " ॥
दैवें स्वप्रतिबिंब त्यास दिसलें; होता पुढें आरसा ।
आली कींव मुलीस, तो न बसला तेणें तिथें फारसा. ॥२॥

" विद्येचें फल काय ? " " एकचि असे–सेवा ! "
" तिची देवता ? " ।
"संख्याहीन समाज अज्ञ उरला जो आमुच्या देखतां! "॥
'त्यातें काय वहाल!'"हें सुमनची.""देशोन्नतीचा पण !
आहे दारुण ! चाललों." वर म्हणे मी होऊनी आपण. ३

"सांगें गोष्ट मुलांस मी इटुकली, त्यां झोंप आणावया. ।
देती उक्तिक स लक्ष सगळे, राजे व राजप्रिया. ॥
ऐकोनी स्तुतिपाठ नर्मसचिवा, देती बिदागी स्वयें. "
"भाटाचीं मुलगी न मी पति असा माझ्या मनाला नये!"४

" पाहोनी स्वर मी उठें, शुभ बघें वेळा प्रयाणास ही ।
ज्योतिर्विद् दिसतां पुढें करिं सदा मीं कुंडल्यांची वही ॥

कार्यारंभ करीं न मी बघितल्या वांचोन सारे ग्रह ! ” ।
“श्रद्धामूढ नको नको पति मला माझा असा आग्रह.” ५

“ आहें जो सुत, बंधु, बांधव, सगा शाळेंतला सोबती ।
शेजारी, धनको, ऋणी, गुरु, धनी इत्यादि भावी पति ॥
त्यांचे हक्क बजावितों न करतां कर्तव्य योग्य क्रमें ! । ”
“भोळा निव्वळ ! मन्मना न पति ये मीं सांगतें संभ्रमें!”६

“ आहें वित्तबलादियुक्त वर मी तत्रापि संस्था अशी ।
लोकीं जी घरजांवई म्हणुन ती द्यावी बुडोनी कशी ? ॥
हुण्डा तो नलगे मला त्यजिन मी कुण्डा जसा अंगणीं !”
“स्त्रीचा पोष्य नको पति,द्विजचि तो दातृस्त्रियांच्या गणीं”७

तों गेला वर एक ओरडत कीं बाला करीं कातरी ।
घेवोनी वरजातिपुष्पमय ही माला इथें कातरी ! ॥
तेथें चूक न आमुची जर तिचा ओंका गळा राहिला !
ज्याचें तो करितो स्वतः अहित हें जाऊन सांगा हिला!८

मामा बोलत “म्हाळसे ! पळविशी तूं या वरांशीं ! मज ।
वाटे मारुतची नभांत विखरी त्या तूळराशी अज ! ॥ ”
लावी दार दिसे सकोप, नकळे कांहींच खोटें खरें ! ॥”
“लग्नाची मुलगी इथें न” इतुकी द्वारीं लिही अक्षरें. ॥९॥

आजी म्हणे मनिं “ मुलें भकलीं पहा हीं ।
मातें उगी न बसवे बघुनी तऱ्हा ही ॥
धाता पुरा स्वमनिं कल्पितसे यथाच
येतें तथाच घडुनी नच अन्यथाच ! ॥१०॥ ”

## प्रसंग १२

कंटाळूनिच काय कीं परतुनी जातां कुमारी खरे ।
आजी तीस पुसे " गडे ! वर बरे यांहून कोठें बरें ? ॥
केला त्वां अविचार देउनि वरां सर्वांस अन्तीं " न " च ।
जा कोठें उलटून घांट पळसा पानें सदा तीनच ! " ॥१॥

मामा व मामळ व मी दुसऱ्या दुपारीं ।
जो तो मुखांत चघळी चिकणी सुपारी ! ॥
आजी सवत्सल म्हणे बघुनी दुरून ।
" वत्सें पहा रंवथ हीं करती बसून ! " ॥२॥

येई पुढें वदत " काय बरें खरेंच ।
होतें तुम्हांस पुसणार अतां बरेंच ॥
तोंडा पुढें मम उभें इतक्यांत होतें. ।
हं ब्रह्म विस्मृतचि आठवलें अहो ! तें. ॥३॥

प्राणी जो उठल्या तसेंच बसल्या सर्वत्र थट्टा करी ।
जन्माची सगळ्या पहा करुनि तो थट्टाच घेतो खरी ॥
भाषा सोड विदूषकी हृदयिं घे माझ्या बऱ्या हेतुला ।
बाळे ! सांग मनांत लग्न अपुलें कर्तव्य आहे तुला ?" ॥४॥

आजी दिसे चढलि फार करून कोपा ।
होता उपाय नमनाविण त्या न सोपा. ॥
येतें जिवावरचि जें चुकल्यें म्हणाया ।
तें साधलें प्रथम कार्य पडून पायां ॥५॥

आजीचा मग लालवर्ण मुखिचा रागासवें ओसरे ।
‘ प्रश्ना उत्तर पाहिजे सरळ ’ हा हेका न कांहीं सरे ! ॥
तेव्हां मी म्हटलें, “नसे दृढ मुळीं जें सांगवेना सुखें ।
पर्यायें वदलें तसें वदविलें मीं मैत्रिणीच्या मुखें. ॥६॥

होतें ठेवुनि नेत्र कान उघडे जों मग्न विद्यार्जनीं ।
सोहाळे सगळे मला समजले जायापतींचे जनीं. ॥
वाणी जों नच ‘ सावधान ’ पडली कानीं विवाहीं खरी ।
व्हावें सावध तोंचि वाटत मला त्या रामदासा परी. ”॥७॥

आजी सत्वर बोलली धरुनियां सक्रोध नाकास या ।
“ज्याला वाक्य पुरेल त्यास नकच्ये प्रस्तावना कासया !”॥
बोलें मी “ न अवश्य वाक्य. कथितें शब्दांत एकाच तें ।
याया उत्तर कारणें न कळतां सारीं तुझीं कांचतें ” ! ॥८॥

आजी बोलत “ लग्न हाच पहिला धर्म स्त्रियांचा खरा. ।
शास्त्रात् रूढि बली असून मिळतो धर्मा तिचा आसरा ।
दोन्हीं ऐहिक पारमार्थिक सुखें साधून आर्यस्त्रिया ।
होती धन्य जगांत वर्णुं कुठल्या शब्दांत ही सत्क्रिया ? ” ९

ही प्रीतियुक्त मधुराक्षर हृद्य वाचा ।
काढीत पूर नयनीं मम आसवांचा. ॥
आजीसहि द्रव सुटे. मग उत्तराचें ।
गेलें उद्यांवरतिं कार्य अखेर साचें ! ॥१०॥

## प्रसंग १३

झाली वेळहि कालची व जमली ती कालची मंडळी ।
मामी मात्र नवी मुला म्हणत " चुप् " द्वारीं उभी
मोकळी. ॥
द्यायातें सरलार्थ उत्तर तदा मीं होउनी आपण ।
केलें अंगुलिला उभारुनि वरी हें हेतुमद् भाषण. ॥१॥

" नारींची सुखसाधनांत गणना चित्ता न दे शान्तिला ।
धंदा तें घर काम आंदण तिचें नाणी प्रतिष्ठा तिला ! ॥
झाला फार उदार अन्य नर तो मानी तिला दागिना ।
ज्याचें त्यास;दुजास दुःख न कळे जन्मास गेल्याविना.॥२॥

जें तूं सांगसि ' जन्मजात असते स्त्री लग्नधर्मी ' न तें ।
मातें मान्य; अजात त्या संवयिचें थोतांड मी मानतें ॥
द्यावा आश्रय ज्या गतानुगतिकें लोकें सदा रूढिला ।
धर्माला वद कॆंवि आश्रय तिचा येईल कामा ढिला ! ॥३॥

पश्चात् खेद नको सहर्षहि नको शीघ्र क्रियेचा क्षण ।
संसारांत शिरावयास न दिसे कांहीं मला कारण. ॥
संसारीं वद अन्य लाभ घडतो स्वार्थाविणें का कधीं ! ।
लोकीं स्वोदरपूरणांत नुसत्या मातें दिसे काकधी ! ॥४॥

स्वार्थाला वश होतसे पुरुष हें पाही तयाला कळे. ।
स्त्रीजातीस न देतसे उरुनियां अस्तित्व तें वेगळें. ॥
मी ती मींच व रूढि रूढिच ! परी स्वातंत्र्य जी वस्तु ती ।
इच्छीं घालविण्या न मी कुणी करी निंदा करो वा स्तुति"

आजी होउनि लाल तोंच वदली " होणार तूं स्वैरिणी ।
पोरी उद्भवलीस भांग तुळसीपोटांत तूं वैरिणी "॥
" छे ! छे ! " मी म्हटलें " नको भय तसें रक्षीन गे
शील मी ।
नीतीचा पथ सोडती न सहसा आर्य स्त्रिया संयमी ! ॥६॥

अज्ञानाचें इथुनि तिथुनी पूर्ण साम्राज्य गाजे ।
आपत्तीचे नग पसरले दुःखदाते जगा जे. ॥
प्रान्तोंप्रान्तीं पटुकटुतर द्वेष विद्वेष माजे ।
ऐशी होतां स्थिति विकटही काय कीजे समाजें ? ॥७॥

झालीं, होतिल, होति. सर्व गमती लग्नें मला सोडती ।
त्यांचा नाद अनिष्ट अन्त बघुनी कोणी न तीं सोडती ! ॥
धर्माचा पट मांडुनी पुरुष हा लावी स्त्रियांचा पण ।
रूढीचे करिं अक्ष घेउन हरे. हा द्यूत खेळे पण ! ॥८॥

हें प्रेम मत्प्रकृतिचें पुरुषावरी न ।
आत्मैक्य मानुनि समाजहिता वरीन ॥
मातें न दुःख; परदुःख हरीन पाहें ।
प्रेम स्वरूप नच मानुष, दिव्य आहे, ॥९॥

अल्प ग्राम्यसुखार्थ–कैंवि सुख तें–सारें असे दुःख तें. ।
'संसारीं शिर जा ' असें म्हण तरी आज्ञा तुझी पाळतें. ॥
नाहीं वाढविलीस तूं मज परी दुःखांत लोटावया "
ऐसें बोलुन हस्त जोडुन उभी मी शांत वेळेस या. ॥१०॥

आजीचा मग चेहरा हळू हळू झाला बहू उज्ज्वल ।
वाटे चित्ति नवा विचार शिरुनी ये निश्चयाचें बल. ॥
बोले ती "मम कार्य ऐहिक नुरे, ठेवूं भवीं कां रती ? ।
श्रीकृष्णा अवतार कार्य सरतां आलीच ना हार ती ? ॥१॥

जी लोकांकरतांच मोक्ष पिकवी त्या आज काशींत मीं ॥
देह त्यागिन हा करून तप त्या शीतोष्णवृष्टींत मीं ! ॥
मामाला तुज आज मी निरवितें दोघांस विश्वंभरा. ।
तो पोषी जग एकलाच विनवूं कां मानवां शंभरां ?" ॥२॥

मामा स्तंभित जाहला मज गमे गेहीं उभा धारण ! ।
आली तीच दशा दिसून सहजीं मामींत साधारण ! ॥
भ्यालें काय ? उरे न धीर, नयनीं ये नीर तेंही जिरे. ।
दृष्टादृष्टिविणें न कार्य दुसरें डोक्यांत माझ्या शिरे. ॥३॥

" येती गोष्ट थरा न या जर " म्हणे तो तेधवां माभळ ।
" पूर्वेचा रवि पश्चिमेस उदया येण्यास घेता पळ ! " ॥
आजी बोलत "सत्य ! सत्य ! गुरुजी ! ही हिंदुंची संस्कृति।
काशीवास व तीर्थवंदन सदा,अन्तींच ईशस्मृति." ॥४॥

आतां श्राव्य सुरांत माभळ वदे "हें 'सत्य' आहे खरें ।
तें पडतां अकल्पितपणें [illegible] [illegible] लेंकरें ! ॥
आम्ही वृद्ध सुजाण आणि अमुची सांगू कशी नात ही ? ।
झाली शिक्षित फार फारचि तरी भोडे अजाणंत ही !

लोकीं हट्ट पदार्थ काय असतो धोंड्याहुनी वेगळा ! ।
खातांना दुखतात दांत व रसें होतो न ओला गळा !" ॥

आजी बोलत " सर्व रोंख तुमचा आला कळों साभळी ।
जाणा एकच गांवच्या सकल या बोरी तशा बाभळी !६॥

तोंडी जन्मभरी करीत सुटण्या मी का समाजाग्रणी ? ।
पावूं भंग ! नमूं न, कीं कळकची दोघीजणी कोंकणी ! ॥
मी ज्या सांगितल्या खरेंच नसती त्या फोल माझ्या म्हणीं ।
मातें पोंचवण्या चला जर न ये ती आडवी ब्राह्मणी ! "

बोले साभळ "सज्ज आश्रित पुन्हां ही संधि का सांपडे ? ।
गाड्याच्या सह आयतीच मजला यात्रा नळ्याला घडे. ॥
येतां उद्धरण्या स्वयें भगवती चालून गंगा घरीं ।
घेई एकचि आळशी न भरुनी पुण्याइच्या घागरी !"॥८॥

आजी जाउनि पोंचली निज मनें केव्हांच ती काशिला ।
जाई मागुन देह निर्द्रव, जरी चन्द्रें द्रवे ती शिला ! ॥
मागें पाहिल कैक वेळ चिमणी गेल्या उडोनी पिलें ! ।
आजीनें नच एकवार फिरुनी आम्हांकडे पाहिलें." ॥९॥

आलें नाहीं मनांत तोंच करिती कार्यें मनस्वी जन. ।
यांच्या एक गुणस्तवांत सगळी टीका करो मज्जन. ॥
गेलें मागुनि मीहि पाउल तिच्या ठेवोनियां पाउलीं ।
मागें जा म्हटल्याहि घोळत पदीं जाते जशी साउली.॥१०॥

## प्रसंग १५

संसाराच्यावर सातिल तें शीघ्र सोडून पाणी ।
आजी राहे वसति करुनी जेथ तो शूलपाणी ।
सांगू काइ ? स्वपर नुरला भेद जीच्या मनांत ।
ती आजी कां गणिल सुत वा जांवई, सून, नात ?॥१॥

जेथें भावें द्विजगण न जों गाउनी थोरवीला ।
प्रातः संध्या करित असतां अर्घ्य देतो रवीला ॥
तेथें आजी अमरतटिनीतीर तें तोंच गांठी ।
साधी स्नान प्रतिदिवशिं हें केवढें पुण्य गांठीं ! ॥२॥

भक्त्युद्रेकें निज सुमन तें वाहुनी भैरवाला ।
नामोच्चारासह करुनियां हस्ततालें रवाला ॥
आत्मज्योति स्थिर उजळुनी आरती आत्मभावें ।
ओंवाळोनी विनवि, मनिचें प्रेम अन्या न ठावें. ॥३॥

" माझ्यापाशीं करयुगल हें आणि हा एक माथा ॥
या वांचोनी किमपि न दुजें ठेविलें भूतनाथा ! ॥
हा मी माथा ! नमवुनि पुढें जोडितें ह्या करांतें ।
केलें सारें मजसिं दिसलें शक्य जें शंकरा तें. ॥४॥

रागद्वेषादिक विकृतिंचा सूक्ष्मही वास नाहीं ।
झालें माझें मन शुचि पळे वैरिणी वासना ही ॥
या जीवाला सुख न मिळतें आज या जीर्ण देहीं ।
त्यांतें कीजे शिवमय विभो मागणी अल्प दे ही." ॥५॥

कालानें जें पिकुनि सुकलें पान त्या पिंपळाचें ।
पावाया तें पतन भुवरी कार्य नाहीं पळाचें. ॥
आजीच्याहि पतन तनुचें जाहलें त्या परीस. ।
सोनें झालें सकल पुसता 'काय भेटे परीस?' ॥६॥

गेली ! गेली ! अहह ! निघुनी केवढी कर्मयोगी
लोकीं येण्या कधिंहि न पुढें स्त्री म्हणोनीच जोगी ।

केलें अस्थिग्रहण मुलिनें जन्हुच्या वीचिहस्तें
आज्ञा जाया परत दिधली पाहिलें हें समस्तें ॥७॥

गेलों गांवा परतुन न जों तों समाचार घेती ।
तोंडाजोगें वदति सगळे गोष्ट जेव्हां निघे ती ॥
मागोनी ते म्हणति "नडली या मुलांची घमेंडी !
पारंबीही तुटुन पडली राहिली नाहिं शेंडी !" ॥८॥

मामा बोले "उजळ शिरिंचे आमुचें छत्र गेलें !" ।
"काळें कैसें" म्हणत गुरुजी "धर्मनिष्ठेस नेलें" ॥
मातें वाटे त्रिभुवन जयी होय तत्त्वाभिमान ।
मामी साध्वी मुळुमुळु रडे नाकळे संविधान ! ॥९॥

जेणें नासे बळ सकल तो कासया शोक वांया ।
स्त्रीला बाधे दृढ विषमता ती हवी घालवाया ॥
नारी व्हाव्या समुचित पथें न्याय्य सत्ताधिकारी ।
संस्था स्थापीं बहुविध पुरीं राहुनी मी कुमारी ! ॥१०॥

ताताचा कल कळतांच आढ्य माई ।
"केली वा ! कशि मुलिनें" म्हणे "कमाई !" ॥
दादाही कथि भयभीत मावशीला ।
कीं बाळी वरिल यशास चारुशीला ! ॥११॥

समाप्त

—मुद्रक :—
कृष्णाजी नारायण सापळे.
१५-१७ त्रिभुवन रोड, गिरगांव मुंबई ४

रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मुंबई नं. ४